**सं.फौ.ख.क्र.७५१/२०२५**
**शासन..वि..शाम**

**<u>नि.क्र.१ वरील आदेश</u>**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. निरीक्षणे–१ B(Gen)-1001/2026/ 223Dt.18/02/2026, तसेच जिल्हा न्यायालय,यवतमाळ यांचे पत्र जा.क्र.१११०/सांख्यीकी/२०२६ दि.२०/०२/२०२६ नुसार दि.09/03/2026 ते दि.13/03/2026 या कालावधीमध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५६(भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७९) व २५८(भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २८१) अन्वये प्रकरणे निकाली काढण्याकरिता विशेष मोहिम राबविण्याबाबत आदेशित केलेले आहे.

२. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तूत खटला आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५(क,ड) अन्वये दाखल झाला आहे. सदरचा खटला साक्षीदार हजर होणेवर प्रलंबित आहे. पुरेशी संधी देवुन देखील अभियोगपक्षातर्फे साक्षीदाराला हजर करण्यात आलेले नाही. खटल्याचे स्वरुप पाहता सदर खटल्याची पुढील कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ नुसार विशेष मोहिमेअंतर्गत बंद करणे आवश्यक आहे. करीता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुत खटल्याची पुढील कार्यवाही फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ नुसार बंद करण्यात येते.
२. आरोपी नामे– शाम दुलसिंग आडे यांची महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५(क ड) या दोषारोपातून मुक्त करण्यात येत आहे.

स्वा/–

दिनांक १२/०३/२०२६

(रोशनी दिपक चौबे)
प्र.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आर्णी
न्यायालय क्र.१